भारतीय वास्तूशास्त्राला सिंगापूर मध्ये प्रचंड प्रतिसाद

ठाणे गौरव पुरस्काराने सन्मानित झालेले, भारतीय वास्तूशास्त्राला जागतिक पातळीवर नेणारे वास्तुशास्त्रतज्ञ डॉ.रविराज अहिरराव यांनी दि. २ ऑक्टोबर २००७ रोजी पत्रकार परिषदेत केलेले निवेदन.

ठाणे : समाजाच्या हिताच्या,मानव जातीला कल्याणकारी ठरणा-या विविध भारतीय शास्त्रांचे वैज्ञानिक पध्दतीने संशोधन करुन ही शास्त्र विश्वाच्या पटलावर मांडणे हया व्यापक दृष्टिकोनातून वास्तुशास्त्र एज्युकेशन रिसर्च फाऊंडेशन कार्यरत आहेत. याच माध्यमातून भविष्यात मानवीजीवन आनंददायी करण्यासाठी भारतीय शास्त्रांचे विद्यापीठ उभारण्याचा मानस आहे. भारतीय वास्तूशास्त्र हे उपयुक्त असून, ते फलदायी आहे. हे प्राचीन शास्त्र सध्याच्या सर्व प्रकारच्या स्पर्धात्मक युगात समाजातील सर्वस्तरातील घटकांना दिलासा देणारे आहे. वास्तुशास्त्राचे हे महत्व लक्षात घेऊन एका वैशिष्टयपूर्ण भूमिकेतून विशिष्ट ध्येय डोळयासमोर ठेवून आम्ही कार्यरत आहोत, असे प्रतिपादन वास्तूशास्त्रतज्ञ डॉ.रविराज अहिरराव यांनी ठाणे येथे पत्रकार परिषदेत केले.

नुकताच आम्ही जागतिक व्यापार केंद्र असणा-या सिंगापूर येथे एका आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभाग घेतला होता. भारतीय वास्तुशास्त्राचे दालन त्या ठिकाणी प्रदर्शित करणारे आम्ही एकमेव भारतीय महाराष्ट्रीय होतो. ज्या ठिकाणी फेंगशुई या शास्त्राचा बोलाबाला अशा ठिकाणी भारतीय वास्तूशास्त्र यशस्वी पोहचविणारे आम्ही ठरलो याचा आम्हाला अभिमान वाटतो. या प्रदर्शनात आम्हाला मिळालेला उत्स्फुर्त प्रतिसाद भारतीय वास्तुशास्त्राचे महत्व अधोरेखित करणारा ठरला आहे. या प्रदर्शनाला युरोप, अमेरिका यासह पूर्व व दक्षिण मध्य अशियातील विविध देशांच्या नागरिकांनी भेटी दिल्या. प्रदर्शनला भेट देणा-या प्रत्येक नागरिकाने आमच्या दालनाला आर्वजून भेट देऊन भारतीय वास्तूशास्त्राला समजावून घेतले. परदेशात भारतीय वास्तुशास्त्राचे स्वागत आहे व त्या विषयी उत्सुकता, कुतूहल आहे हे त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून जाणवले. अनेकांनी आपल्या देशात भारतीय वास्तुशास्त्राची नियमित व्याख्याने, सातत्यपूर्ण सेवा यासाठी आम्हाला आमंत्रित केले आहे. परदेशातून आलेली ही आमंत्रण आमच्यासाठी विशेष समाधान देणारी आहेत. कारण, यामुळे भारतीय वास्तुशास्त्राचा जागतिक पातळीवर गौरव होईल. या प्रदर्शनातून सिंगापूरचे उद्योग व व्यापारमंत्री श्री ईश्वरन यांनी भेट दिली. त्यांनी आमच्या दालनासाठी अधिकवेळ देऊन भारतीय वास्तशास्त्र समजावून घेतले. त्यांनी ही सेवा सिंगापूरच्या बांधकाम व्यवसायासाठी देण्याचे आवाहन केले. दि. १८ ते ३० ऑक्टोबर २००७, दरम्यान सिंगापूर मधील विविध संस्थाच्या निमंत्रणावरुन विविध कार्यक्रम ठरले आहेत.

वास्तुशास्त्र एज्युकेशन रिसर्च फाऊंडेशन चा मूळ उद्देश वास्तूशास्त्राबाबत जनजागरण, समाज प्रबोधन हा आहे. सर्वसामान्यांच्या श्रध्देशी खेळणा-या, शॉर्टकट पध्दती वापरुन स्वार्थासाठी वास्तूशास्त्राविषयी गैरसमज निर्माण करणा-यांच्या विरोधात आम्ही काम करीत आहोत. आमचे काम सकारात्मक आहे. नागरिकांच्या असहायतेचा गैरफायदा न घेता त्यांना त्यांच्या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सहकार्य करणे हे फाऊंडेशन करीत आहे.

महाराष्ट्र व गोव्यासह फाऊंडेशनचा वीस ठिकाणी नियमित अभ्यासक्रम चालतो. दृकश्राव्य माध्यमातून हा अभ्यासक्रम शिकविला जातो. यात वैज्ञानिक पध्दतीने डाटाबेस पुरविला जातो. त्याचप्रमाणे महाराष्ट्रासह परदेशात आतापर्यंत ५२ बॅचेस मधून २००० प्रशिक्षणार्थी तयार केले गेले आहे. वास्तूच्या मूळ रचनेत बदल न करता, तोडफोड न करता ती लाभदायी ठरविण्याचे सूत्र यात स्विकारले जाते. याचाच एक भाग म्हणून दि.७ ऑक्टोबर २००७, रविवार रोजी एकाचदिवशी भाईंदर, बोरिवली, विलेपार्ले, दादर, मुंबईसेंट्रल येथे विनामूल्य व्याख्यान योजली आहेत. "समजा, शिका व प्रसार करा" या भूमिकेतून काम करणारे केवळ महाराष्ट्रातील नव्हेतर भारतातील आम्ही एकमेव वास्तूशास्त्रतज्ञ असू. वास्तूशास्त्र अभ्यासक्रमात सखोल थिअरी - प्रॅक्टीकल - केस स्टडीज, प्रोजेक्ट रिर्पोर्ट, परीक्षा प्रमाणपत्र व विनातोडफोड उपाय योजनांचे सखोल ज्ञान.

ठाण्यात ऑक्टोबरच्या दुस-या आठवडयात ठाण्यातील नामवंत वास्तुविशारद व बांधकाम व्यवसायिक यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसभराचे चर्चासत्र योजले आहे. यात वास्तुशास्त्राची वैज्ञानिक, व्यवहारिक चर्चा होईल.

वास्तुशास्त्राची अध्यात्मिक-पौराणिक-वैज्ञानिक-व्यवस्थापनशास्त्र व रोजच्या जिवनाशी संबधित सर्व गोष्टींचा उहापोह करणारा मराठी रंगभूमीवरील दोन अंकी एक पात्री पहिलाच धाडसी प्रयोग असुन येत्या काही दिवसात या कार्यक्रमाचा ७५वा प्रयोग संपन्न होत आहे. वास्तुरविराज हा वास्तुशास्त्रा विषयीचा रंजक, माहितीपूर्ण कार्यक्रम ७५ प्रयोग पूर्ण करणार आहे. आता पर्यंतच्या प्रयोग वास्तुशास्त्राविषयी जाणीव-जागृती निर्माण करणारे ठरले आहे.

आम्ही करीत असलेला हा वेगळा प्रयोग भारतीय वास्तुशास्त्राला जगात किर्ती देण्याचा आहे. ठाणे महापालिकेने दिलेला ठाणे गौरव पुरस्कार हा आमचा वैयक्तिक नसून आमच्या कार्याचा व भारतीय वास्तूशास्त्राचा गौरव आहे असे आम्ही मानतो.